दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २४७ | MAHMAR/2006/17212 | रायगड | गुरुवार, दि.४ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील रविवार येणार खांदावसाहतीमध्ये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील रविवार दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी पनवेल च्या ऐतिहासिक भूमीत दाखल होणार आहेत.

सकल मराठा समाज मंडळ खांदा वसाहत येथे रविवार दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता मराठा भवन उदघाटन व मराठा कृतज्ञता मेळावा या कार्यक्रमानिमित्त मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील येणार असून या कार्यक्रमासाठी पनवेल मधील आपण सर्व समाज बांधवानी आवर्जून उपस्थित राहावे व समाज कर्तव्य बजवावे अशी आग्रहाची विनंती संतोष जाधव यांनी केली आहे .

# ठेकेदार काम अर्धवट सोडून गेल्याने ३४ कोटी खर्चाचे करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम रखडले

### खर्च वाढल्याने नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू ; निविदा प्रक्रियेनंतर वर्षभरातच काम पूर्ण होणार

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण ।** कंत्राटदार काम अर्धवट सोडून गेल्याने ३४ कोटी खर्चाच्या करंजा-रेवस सागरी मार्गावरील रो-रो जेट्टीचे काम मागील काही महिन्यांपासून रखडले आहे. त्यामुळे रो-रोचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी खर्चात वाढ झाली आहे.त्यामुळे आता पुन्हा नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती मुंबई सागरी महामंडळाचे कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी दिली आहे.



कोकणशी जोडणाऱ्या करंजा -रेवस सागरी मार्गावरील पर्यटक व प्रवाशांना कमी वेळेत सुरू करण्यासाठी रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाचे काम सागरमाला योजनेतून सुरू करण्यात आले होते. ३४ कोटी खर्चाच्या रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाच्या कामावर मोठ्या प्रमाणावर खर्चही करण्यात आला आहे.मात्र अद्यापही या सागरी मार्गावरील काम अपूर्ण अवस्थेत असल्याने रो-रो सेवा सुरू झालेली नाही.

करंजा बंदरातील रो-रो जेटीचे काम पूर्ण झाले आहे. मात्र रेवस येथील रो-रो जेट्टीचे काम मागील काही महिन्यांपासून रखडले आहे. काही प्रमाणात बांधकाम, ब्रेकवॉटर जेट्टी, ड्रेझिंग, वाहनतळ व जोडरस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. समुद्रातील पायलिंगची बहुतांश कामेही अद्याप अपुऱ्या अवस्थेत आहेत.मात्र ठेकेदार जेट्टीचे काम अर्धवट अवस्थेत सोडून गेल्याने करंजा -रेवस रो-रो सेवेचे काम रखडले आहे. ठेकेदार काम अर्धवट सोडून गेल्याने त्याला टर्मिनेट करण्यात आले आहे.त्यामुळेच करंजा -रेवस रो-रो सेवेचे काम रखडले आहे.रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी आचारसंहिता संपुष्टात येताच आता नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.या विलंबामुळे कामाच्या खर्चातही वाढ होणार आहे.

निविदा प्रक्रीयेनंतर वर्षभराच्या कालावधीत रखडलेल्या करंजा -रेवस रो-रो सेवेचे काम पूर्ण होईल अशी माहिती मुंबई सागरी महामंडळाचे कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी दिली आहे. दरम्यान सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे. ठेकेदाराला केलेल्या कामांची बिले अदा करण्यात करण्यात दिरंगाई झाली आहे.यामुळेच ठेकेदार काम अर्धवट सोडून गेल्याचे सांगितले जात आहे.

# पुण्याच्या जमीन घोटाळ्यातील आरोपी शीतल तेजवानीला अटक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

येथील मुंढव्यातील ४० एकर जमीन घोटाळाप्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून तिची चौकशी देखील करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी ही जमीन खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये, प्रकरणातील तपासाचा वेग वाढवल्यानंतर पोलिसांनी मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवानीची याआधी दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली.

पुणे जमीन घोटाळा प्रकरणातील दाखल झालेला गुन्हा रद्द करण्यासाठी शीतल तेजवानीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर याबाबत सुनावणी देखील झाली. मीडिया रिपोर्ट्समुळं आपणास लक्ष्य केलं जात असल्याचा दावा तेजवानीने याचिकेत केला होता. एफआयआर मीडिया रिपोर्टवर गुन्हा दाखल केला असून मीडियात फरार घोषित करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. दुसऱ्या जमिनीप्रकरणी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून तेजवानीची उपस्थिती आवश्यक असल्याचा युक्तिवाद देखील वकिलांनी केला होता.



मुंढवा जमीन गैरव्यवहाराबद्दल आधी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या बावधन पोलीस ठाण्यात दिग्वीजय पाटील, शीतल मेजवानी आणि रविंद्र तारु यांच्या विरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर, पुणे पोलिसांनी देखील यात उडी घेत नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. आता, शीतल तेजवानीला अटक करण्यात आली आहे.

# पेण खोपोली मार्गावर दोन जिवलग मित्रांचा अपघात ; १ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । दिपक लोके**

**पेण ।** पेण खोपोली मार्गावर अपघाताची मालिका सुरूच असून काल दिनांक २ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आंबेघर पेट्रोल पंप जवळ हॉटेल टिक्का समोर आंबेघर बाजूकडून पेण कडे जाणाऱ्या जुपिटर गाडी नंबर MH 06 B Y 5723 या बाईकला पेण शहराच्या दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने यामध्ये बाईकस्वार राज वसंत पवार वय वर्ष २३ राहणार गांगळ आळी पेण याचा मृत्यू झाल्याची दुखद दायक घटना घडली आहे.

याआधी देखील गणपतीवाडी हॉटेल सौभाग्य इन समोरील अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच या अपघातात राज वसंत पवार राहणार गांगळ आळी आणि करण चंद्रहास प्रसाद राहणार वडगाव या दोन जिवलग मित्रांचा अपघात झाला आहे. यामध्ये राज वसंत पवार याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यातच त्याचा मृत्यू झाला तर करण याच्या उजव्या पायाला दुखापत झाल्याने त्याला पुढील उपचाराकरिता MGM रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सदर घटनेची नोंद पेण पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस चव्हाण हे अधिक तपास करीत आहेत.

# ओळखीच्याच व्यक्तींकडून दागिन्यांची लूट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओळखीच्या व्यक्तीकडून दागिन्यांची लूट झाल्याची घटना आदई येथील बालाजी स्प्लेंडर इमारतीमध्ये घडली आहे .

तालुक्यातील आदई येथील बालाजी स्प्लेंडर इमारतीमध्ये राहणारे दाम्पत्य तीन दिवसांपूर्वी कामावर गेले होते. त्याच दिवशी त्यांच्या घरी गावावरून आलेला त्यांचा चुलत भाऊ होता. कामावरून घरी आल्यावर त्यांचा भाऊ त्यांना दिसला नाही. दुसऱ्या दिवशी त्यांना घरातील सोन्याचे दागिने ठेवलेल्या जागेवर सहा लाखांचे दागिने सापडले नाहीत. अखेर या दाम्पत्याने खांदेश्वर पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली.

### आ.प्रशांत ठाकूर यांचा प्रयत्न यशस्वी

# चिपळे पूल ते नेरे रस्ता दुरुस्ती कामाला तातडीने सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोच्या नैना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम आजपासून सुरु झाले आहे. हा रस्ता दररोजची वर्दळ असलेला असून, यावरील मोठमोठे खड्डे आणि उखडलेल्या भागांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. आता या कामाला सुरुवात झाली असून प्रवासी नागरिक वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. याकामी आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रयत्न कामी आले आहेत.

पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेला हा रस्ता सिडकोकडे हस्तांतरणानंतर नैना हद्दीत समाविष्ट झाला आहे. कायम वर्दळीचा रस्ता खराब झाल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांच्या मागणीला गांभीर्याने घेत सिडको व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन दिले होते आणि रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले होते. या रस्त्याचे काम तातडीने सुरू झाले आहे. आमदार ठाकूर यांचा पुढाकारामुळे नागरिकांना आता सुरक्षित आणि सुकर प्रवासासाठी दिलासा मिळाला असून नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



# विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची ३५ लाख रुपयांची देणगी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्यार्थ्यांसाठी उत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या आपल्या सामाजिक बांधिलकीतून थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिन्नर तालुक्यातील दोन शैक्षणिक संस्थांसाठी एकूण ३५ लाख रुपयांची देणगी दिली आहे.



रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर यांनी ठाणगाव येथील पुंजाजी रामजी भोर विद्यालय आणि डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालय या संस्थांसाठी नवीन इमारत बांधकामासाठी २५ लाख रुपये तर सिन्नर तालुक्यातील पांगरी येथील श्री संत हरीबाबा विद्यालयसाठी १० लाख रुपये इतकी देणगी प्रदान केली आहे.

ही देणगी ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्ट्स यांच्या सीएसआर फंडातून करण्यात आली असून, बुधवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते धनादेश विद्यार्थ्यांच्या हितासाठी संस्थांना दिला गेला.

यावेळी पुंजाजी रामजी भोर विद्यालयाचे मुख्याध्यापक काशिनाथ लक्ष्मण तळपाडे आणि डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र चंद्रभान काकड उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या या उदार योगदानामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आधुनिक आणि सुसज्ज इमारतींमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकणार आहेत, जे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाची पायाभूत सुविधा ठरेल.

# उरणमध्ये स्ट्राँग रूमला पोलिसांचा कडक बंदोबस्त

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**

**उरण ।** उरण नगरपरिषदेचे सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाली निकाल ३ डिसेंबर २०२५ लागणार होते मात्र उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार उरण नगरपरिषदेच्या निकाल २१ डिसेंबर २०२५ लागणार आहे. न्यायालयाने मतपेटी या कडक बंदोबस्त मध्ये ठेवण्यात यावेत असे आदेश दिल्याने उरण नगरपरिषदेत स्ट्राँग रूम तयार करण्यात आले असून या स्ट्राँग रूममध्ये मतपेटी सुरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. स्ट्राँग रूमसाठी २४ तास कडक पोलिस बंदोबस्त असून एक ए पी आय व १२ अंमलदार दिवसासाठी कार्यरत आहेत तर रात्री एक अधिकारी वीस पोलीस कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश देवरे यांनी दिली आहे.

उरण नगर परिषदेच्या स्ट्राँग रूममध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यरत असून एकूण आठ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. कॅमेऱ्याच्या माध्यमातून स्ट्राँग रूम वर,मतपेटीवर लक्ष ठेवले जात आहे. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी कधीही येऊन जाऊ शकतात. बघून जाऊ शकतात त्यांचे रजिस्टर वेगळे ठेवले आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली आहे. स्ट्राँग रूमसाठी उरण पोलिसांचा कडक बंदोबस्त असून महाराष्ट्र शासनातर्फे योग्य ती खबरदारीचे उपायोजना स्ट्राँग रूमसाठी करण्यात आले आहेत.निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व नियमांचे पालन करून स्ट्राँग रूम व मतपेटी सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.



# कारमध्ये सापडले पिस्टल



**दै.रायगड नगरी । पनवेल**

चार चाकी फॉर्च्युनर कार मध्ये वाहतूक पोलिसांना पिस्तल सारखे शस्त्र सापडून आले. पुढील कायदेशीर कारवाई करण्यासाठी कारचालकाला खांदेश्वर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले.

पनवेल वाहतूक शाखा हद्दीतील नवीन पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, पोलीस उपनिरीक्षक शेरखाने, पोलीस हवालदार युवराज येळे, अमीर मुलानी, केशव निकम हे वाहतूक नियमन करत होते. यावेळी फॉर्च्युनर कार क्रमांक एम एच ०३ ए एच ७८६३ हे पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. या वाहनचालकाला संपर्क साधून वाहन बाजूला घेण्याबाबत माहिती देण्यात आली. फोरचुनर क्रमांकावर नोंद असलेल्या मालकाशी संपर्क साधला असता त्याने ते वाहन माझे नसून कोणीतरी अज्ञात व्यक्ती माझ्या गाडीचा नंबर वापरत असल्याचे आणि त्याबाबत वेळोवेळी तक्रारी केल्याचे कळवले.

संशय आल्याने वाहतूक पोलिसांनी वाहनाची पाहणी केली यावेळी कारचा दरवाजा अर्धवट उघडा होता. दरवाजा उघडून पाहणी केली असता आत पिस्टल सारखे शस्त्र आढळून आले. तसेच गाडीमध्ये ड्रायव्हिंग लायसन्स राजेंद्र निकम या नावाचे सापडले. कोर्ट चेकर प मध्ये पाहणी केली असता या इसमावर यापूर्वी मुंबई विभागात गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर खांदेश्वर पोलिसांच्या ताब्यात फॉर्च्यूनर कार चालकाला देण्यात आले.

# मुख्यमंत्री, राज ठाकरे यांच्याकडून संजय राऊत यांची विचारपूस



**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांना गंभीर आजाराचे निदान झाल्याने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यापाठोपाठ मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांची भेट घेतली. या गंभीर आजारातूनही काही दिवसांपूर्वी संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेतली होती. यावर दीड - दोन महिने आराम करा, असा सल्ला राज ठाकरे यांनी या भेटीदरम्यान दिला आहे. दरम्यान, मंगळवारी रात्री एका विवाह समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राऊत समारोसमोर आल्यावर मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

संजय राऊत यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. आजारापेक्षा उपचार भयंकर असल्याचे विधान त्यांनी पत्रकार परिषदेदरम्यान केले होते. आपल्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होत असल्याचेही ते म्हणाले होते. राज ठाकरे यांनी त्यांची भांडुप येथील निवासस्थानी भेट घेऊन प्रकृतीविषयी विचारपूस केली. अर्धा तास दोघांमध्ये चर्चा झाली.

ज्या प्रकारचा आजार आहे. त्यानुसार राहावे लागेल. लोकांमध्ये न जाता दीड-दोन महिने आराम करावा, असा सल्ला त्यांनी संजय राऊत यांना दिल्याची माहिती आमदार सुनील राऊत यांनी दिली.

राज ठाकरे हे वेळोवेळी संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस करीत असतात. उपचारासाठी अमेरिकेला नेले पाहिजे किंवा अन्य काही केले पाहिजे याबाबतही त्यांनी विचारणा केली. तब्बल २० वर्षांनी ते घरी आल्याचे सांगताना, त्यावेळच्या घराच्या रचनेपासून ते घरापर्यंत पोहोचणाऱ्या रस्त्यात झालेल्या बदलापर्यंत या दोघांमध्ये गप्पा रंगल्याचे सुनील राऊत म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनीही मंगळवारी रात्री एका विवाह समारंभात संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

या वेळी मुख्यमंत्री व राऊत या दोघांमध्ये बराच वेळ चर्चा झाल्याचे सांगण्यात येते.

# अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त !



अत्रीऋषींची पत्नी अनसूया ही पतीव्रता होती. पातिव्रत्यामुळे तिच्या अंगी एवढे सामर्थ्य आले की, इंद्रादी देव घाबरले आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांकडे जाऊन म्हणाले, ''तिच्या वराने कोणालाही देवांचे स्थान मिळू शकेल किंवा कोणीही देवांना मारू शकेल; म्हणून तुम्ही काहीतरी उपाय करा, नाहीतर आम्ही तिची सेवा करू.'' हे ऐकून त्रिमूर्ती म्हणाले, ''एवढी काय मोठी पतीव्रता, सती आहे, ते आपण पाहू.'' एकदा अत्रीऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेल्यावर अतिथींच्या वेशात त्रिमूर्ती आले आणि अनसूयेकडे त्यांनी भिक्षा मागितली. त्यावर अनसूयेने सांगितले, ''ऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेले आहेत. ते येईपर्यंत थांबा.'' तेव्हा त्रिमूर्ती अनसूयेला म्हणाले, ''ऋषींना परत यायला वेळ लागेल. आम्हाला खूप भूक लागली आहे. लगेच अन्न द्या, नाहीतर आम्ही दुसरीकडे जाऊ. ऋआश्रमात आलेल्या अतिथींना तुम्ही इच्छाभोजन देता', असे आम्ही ऐकले आहे; म्हणून इच्छाभोजन करण्यास आम्ही आलो आहोत.'' मग अनसूयेने त्यांचे स्वागत केले आणि जेवायला बसण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते जेवायला बसले. ती जेवण वाढायला आल्यावर ते म्हणाले, ''तुझे सुंदर रूप पाहून आमच्या मनात अशी इच्छा झाली आहे की, तू विवस्त्र होऊन आम्हाला वाढावेस.'' त्यावर 'अतिथीला विन्मुख पाठवणे अयोग्य होईल. माझे मन निर्मळ आहे, मग कामदेवाची काय बिशाद आहे ? माझ्या पतीचे तपफळ मला तारील', असा विचार करून ती अतिथींना म्हणाली, ''मी तुम्हाला विवस्त्र होऊन वाढीन. तुम्ही आनंदाने भोजन करा.'' मग स्वयंपाकघरात जाऊन पतीचे चिंतन करून तिने विचार केला की, 'अतिथी माझी मुले आहेत' आणि विवस्त्र होऊन वाढायला आली. पहाते तो अतिथींच्या जागी रडणारी तीन लहानबाळे ! त्यांना कडेवर घेऊन तिने स्तनपान करवले आणि बाळांचे रडणे थांबले. इतक्यात अत्रीऋषी आले. तिने त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला. ती म्हणाली, ''स्वामिन् देवेन दत्तं ।'' याचा अर्थ असा आहे - 'हे स्वामी, देव-ाने दिलेली (मुले).' यावरून अत्रींनी त्या मुलांचे नामकरण 'दत्त' असे केले. बाळे पाळण्यात राहिली आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश त्यांच्यासमोर उभे राहिले आणि प्रसन्न होऊन 'वर मागा', असे म्हणाले. अत्री आणि अनसूयेने 'बालके आमच्या घरी रहावी', असा वर मागितला. पुढे ब्रह्मदेवापासून चंद्र, विष्णूपासून दत्त आणि शंकरापासून दुर्वास झाले. तिघांपैकी चंद्र आणि दुर्वास तप करण्यास जाण्यासाठी अनुमती घेऊन अनुक्रमे चंद्रलोकी आणि तीर्थक्षेत्री गेले. तिसरे दत्त विष्णुकार्यासाठी भूतलावर राहिले.

दत्तांच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी आणि चार श्वान म्हणजे चार वेद. औदुंबराचा वृक्ष हे दत्ताचे पूजनीय रूप आहे; कारण त्यात दत्ततत्त्व जास्त प्रमाणात असते. दत्तगुरूंनी पृथ्वीला गुरु केले आणि पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि सहिष्णु असावे अशी शिकवण घेतली. तसेच अग्नीला गुरु करून, हा देह क्षणभंगूर आहे, अशी शिकवण अग्नीच्या ज्वालेपासून घेतली. अशाप्रकारे चराचरांतील प्रत्येक वस्तूमध्ये ईश्वराचे अस्तित्व पहाण्यासाठी म्हणून दत्तगुरूंनी चोवीस गुरु केले. ऋश्रीपाद श्रीवल्लभ' हा श्रीदत्तांचा पहिला अवतार आणि ऋश्री नृसिंह सरस्वती' हा दुसरा अवतार होय. तसेच ऋमाणिकप्रभु' तिसरे आणि ऋश्री स्वामी समर्थ महाराज' हे चौथे अवतार होत. हे चार पूर्ण अवतार असून अंशात्मक अवतार अनेक आहेत. जैनपंथीय दत्तगुरूंकडे ऋनेमिनाथ' म्हणून पहातात आणि मुसलमान ऋफकिराच्या वेशात' पहातात. दत्त दररोज खूप भ्रमण करीत. ते स्नानासाठी वाराणसीला, चंदनाची उटी लावायला प्रयागला जात, तर दुपारची भिक्षा कोल्हापूरला मागत आणि दुपारचे जेवण पांचाळेश्वर, बीड जिल्हा येथे गोदावरीच्या पात्रात घेत असत. तांबुलभक्षणासाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात राक्षसभुवन येथे जात, तर प्रवचन आणि कीर्तन ऐकण्यासाठी नैमिष्यारण्यात बिहार येथे पोहोचत. निद्रेसाठी मात्र माहूरगडावर जात आणि योग गिरनार येथे करीत. दत्तपूजेसाठी सगुण मूर्तीऐवजी पादुका आणि औदुंबरवृक्ष यांची पूजा करतात. पूर्वी मूर्ती बहुदा एकमुखी असायची. हल्ली त्रिमुखी मूर्ती जास्त प्रचलीत आहे. दत्त हे ऋगुरुदेव' आहे. दत्तात्रेयांना परमगुरु मानले आहे. त्यांची उपासना गुरुस्वरूपातच करावयाची असते. ऋश्री गुरुदेव दत्त', ऋश्री गुरुदत्त' असा त्यांचा जयघोष करतात. ऋदिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' ही नामधून आहे. दत्तात्रेयाच्या खांद्याला एक झोळी असते. झोळी हे मधुमक्षिकेचे (मधमाशीचे) प्रतीक आहे. मधमाशा जशा ठिकठिकाणी जाऊन मध गोळा करतात आणि तो एकत्र जमवितात, तसे दत्त दार-ोदारी फिरून झोळीमध्ये भिक्षा जमवतात. दारोदारी हिंडून भिक्षा मागितल्याने अहं लवकर कमी होतो; म्हणून झोळी ही अहं नष्ट झाल्याचेही प्रतीक आहे.

दत्तांच्या पूजेला सुरुवात करण्याआधी करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने स्वत:च्या कपाळावर विष्णूप्रमाणे दोन रेषांचे उभे गंध लावावे. अशाप्रकारे गंध लावल्याने दत्ततत्त्वाचा अधिक प्रमाणात लाभ होतो. तसेच गंधातील सात्त्विकतेमुळे भावजागृती होण्यास साहाय्य झाल्याने पूजा करतांना मन लवकर एकाग्र होते. यामुळे पूजेतून मिळणारे चैतन्य अधिक प्रमाणात ग्रहण करता येते. दत्तांची पूजा करतांना गंध करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने लावावे. तसेच हळद-कुंकू वाहतांना आधी हळद आणि नंतर कुंकू उजव्या हाताच्या अंगठा आणि अनामिका यांच्या चिमटीत घेऊन चरणांवर वाहावे. आदल्या दिवशीचे निर्माल्य काढतांनासुद्धा अंगठा आणि अनामिका याच दोन बोटांचा वापर करावा. अंगठा आणि अनामिका जोडून होणार्या मुद्रेमुळे शरीरातील अनाहतचक्र जागृत होते. त्यामुळे भक्तीभाव निर्माण होण्यास साहाय्य होते. विशिष्ट फुलांमध्ये विशिष्ट देवतेचे तत्त्व आकृष्ट करण्याची क्षमता अन्य फुलांच्या तुलनेत अधिक असते. जुई आणि निशिगंधाच्या फुलांमध्ये दत्ततत्त्व आकृष्ट करण्याची क्षमता सर्वांत जास्त असल्याने दत्तांना ती फुले वाहिल्यास दत्ततत्त्वाचा लाभ अधिक प्रमाणात होतो. देवतेच्या चरणी फुले विशिष्ट संख्येत आणि विशिष्ट रचना करून वाहिल्यास, फुलांकडे त्या त्या देवतचे तत्त्व लवकर आकृष्ट होते. या तत्त्वानुसार दत्तांना फुले वाहतांना ती सात किंवा सातच्या पटीत शंकरपाळ्याचा आकार होईल, अशा प्रकारे वाहावीत. विशिष्ट देवतेचे तत्त्व विशिष्ट गंधाकडे लवकर आकृष्ट होते. चंदन, केवडा, अंबर आणि हीना या गंधांकडे दत्ततत्त्व लवकर आकृष्ट होते. यामुळे या गंधांच्या उदबत्त्या दत्तपूजेत वापरल्यास दत्ततत्त्वाचा लाभ अधिक प्रमाणात होतो. देवाला ओवाळतांना उदबत्ती उजव्या हाताची तर्जनी आणि अंगठा यांत धरून घड्याळाच्या काट्यांच्या दिशेने तीन वेळा ओवाळावी. (साभार - सनातन संस्थेचा ग्रंथ - श्रीदत्त)

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# ज्वेल हाईटसमोरील रखडलेला रस्ता अखेर मार्गी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर, सेक्टर १० मधील ज्वेल हाईट इमारतीसमोरील सुमारे १०० ते १५० मीटरचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून डांबरीकरणाविना रखडलेला होता. सुरुवातीला सिडकोच्या ताब्यात असताना हा रस्ता तयार झाला; मात्र नंतर पनवेल महानगर पालिकेच्या अखत्यारीत आल्यानंतरही या रस्त्याची कोणतीही दुरुस्ती अथवा डांबरीकरणाचे काम झाले नव्हते. परिणामी येथील रहिवासी मोठ्या गैरसोयीला सामोरे जात होते.

ज्वेल हाईट्स सोसायटीचे चेअरमन प्रशांत शिंगाडे, अशोक भोसले, विनोद वावरे, देवेंद्र शर्मा, वीरेंदर शर्मा, हिना सिंग यांनी सर्व कमिटी सदस्यांसह खारघर भाजप शहर मंडलाचे उपाध्यक्ष अजित अडसुळे यांना बोलावून भेट घेतली. रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. अडसुळे यांनी तात्काळ पनवेल महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधत संबंधित विभागाला निर्देश दिले. त्यानंतर पुढील तीन दिवसांत रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात आले. काम सुरू होताच काही आजी-माजी समाजसेवकांनी घटनास्थळी येऊन फोटोसेशन करत श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगली. मात्र प्रत्यक्षात हा रस्ता मार्गी लावण्यासाठी रहिवाशांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच कामाला गती मिळाल्याचे नागरिकांचे मत आहे.

रस्त्याच्या डांबरीकरणामुळे ज्वेल हाईट परिसरातील वाहतूक पूर्वी-पेक्षा सुरळीत होण्यास मदत होणार असून रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्र ही संतांची भूमी, वारकरी हे संस्कृती रक्षक : महेंद्रशेठ घरत



**दै.रायगड नगरी । उलवे**

वारकरी, मंदिरे, शाळा, क्रिकेट, कलावंत आणि दीन-दुबळे, गरजवंत यांना साह्य करणे मी माझे कर्तव्य समजतो. जिल्ह्यात किंबहुना महाराष्ट्रात मंदिरांना आणि वारकरी मंडळींना सहकार्य करण्यात मी कधीही हात आखडता घेतला नाही. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि वारकरी हे या भूमीचे पाईक आहेत. ते तुकोबा, ज्ञानोबा, विठ्ठल-रखुमाईचे निस्सीम भक्त आहेत. त्यामुळे वारकरी हा माझा श्रद्धेचा विषय आहे. आषाढी-कार्तिकीला मी पंढरपूरला आवर्जून जातो. तेथे गेल्यानंतर जे समाधान मिळते ते अफलातून असते. वारकरी बांधव हे संस्कृती रक्षक आहेत. त्यांच्या भजन-कीर्तनाच्या परंपरेने महाराष्ट्राचे नाव जगात अभिमानाने घेतले जाते. पाय जमिनीवर ठेवून मातीशी घट्ट नाते असलेल्या वारकऱ्यांचे योगदान महाराष्ट्र या संत भूमीत अनन्यसाधारण आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत मंगळवारी (ता. २) मोहोपाडा येथे म्हणाले.

रिस येथील निवृत्ती महाराज मुंढे म्हणाले, वारकरी सांप्रदायासाठी सढळ हाताने मदत करणारे म्हणजेच महेंद्रशेठ घरत! सामाजिक कार्यासाठी मदत करण्यात त्यांचा हात कुणी धरू शकत नाही. आमचा सप्ताह गेली १२ वर्षे अखंड चालू आहे. दरवर्षी आम्हाला ते ५१ हजार रुपयांचे साह्य करतात. त्यांचा साह्य करण्याचा पिंड आम्हा वारकऱ्यांसाठी खूप मोलाचा आहे. त्यांचे थोरपण, मोठेपण आणि मोलाचे योगदान जगावेगळे आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. गरीब दीन-दुबळ्यांना मदत करण्यासाठी त्यांना आम्हा वारकरी मंडळींचा नेहमीच आशीर्वाद असेल.

वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ, रसायनी, पाताळगंगा, खालापूर, पनवेल परिसर अखंड हरिनाम सप्ताह जनता विद्यालय मोहोपाडा, रसायनी येथे सुरू आहे. त्यांना ५१ हजार रुपयांचे साह्य महेंद्रशेठ घरत यांच्याकडून करण्यात आले. या सप्ताहात पनवेल पंचक्रोशीतील हजारो वारकरी सहभागी झाले आहेत. वारकरी, भजन-कीर्तनकारांच्या सेवेमुळे परिसर भक्तिमय झाला आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या **मौजे-वरचे ओवळे** बांधकाम क्रमांक **VO-क्षेत्र-५००.०० चौ.मी. व हे. आर** या संपादित जमिनीचे बांधकामधारक **श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण भगत** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकती पोटी त्यांना पुष्पक नोड (वडघर) येथील **भूखंड क्र.१२१, सेक्टर-१, क्षेत्र- ५००.०० चौ.मी.** चे संचिका क्र. **VOV-ICIG-२४२** वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

पुष्पक (वडघर) येथील **भूखंड क्र. १२१, सेक्टर-१, क्षेत्र- ५००.०० चौ.मी.** हा भूखंड **श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण भगत** यांना **दि. २६.०८.२०१५** रोजी वाटपित करण्यात आला असून, सदर भूखंडाचा **दि.१३.०६.२०१८** रोजी भाडेपट्टा करारनामा करण्यात येवून नोंदणीकृत करण्यात आला आहे.

तदनंतर **श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण भगत** यांनी त्यांचे **सख्खे भाऊ श्री. तुकाराम लक्ष्मण भगत** यांना पनवेल सह-दुय्यम निबंधक कार्यालय येथील नोंदणी क्र. पवल-३-१६०७८-२०१९ दि.३०.१०.२०१९, पावती क्र. २००२६ नुसार त्यांच्या **अविभाज्य हिस्स्यामधील ५० % क्षेत्र म्हणजेच क्षेत्र- २५०.०० चौ.मी. बक्षीसपत्रान्वये** हस्तांतरण करण्यात आले आहे. तसेच या विभागातून शुद्धीपत्रान्वये अंतिम आदेश **क्र. सिडको/अमुभूवभू/नमुंआंवि/वरचे ओवळे/२०१९/३५४२, दि.०९.१२.२०१९** देण्यात आले आहे.

वाटपपत्रात नमुद करण्यात आलेल्या भूखंडधारकांपैकी **कै. तुकाराम लक्ष्मण भगत** यांचे दि.२५.११.२०२३ रोजी निधन झाले असल्याने पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर यांचेकडील दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८२५/२०२४ यांनी **कै. तुकाराम लक्ष्मण भगत यांचे वारस म्हणून १. श्रीमती. पार्वती लक्ष्मण भगत, २. श्रीमती. सविता तुकाराम भगत, ३. श्री. ओमकार तुकाराम भगत, ४. श्रीमती. अक्षता अचित म्हात्रे उर्फ अक्षता तुकराम भगत, ५. कुमारी. स्नेहा तुकाराम भगत, ६. कुमारी, प्रतीक्षा तुकाराम भगत** यांना वारस म्हणून घोषित करण्यात आले आहे. या अनुषंगाने या विभागातून **क्र. सिडको/अमुभुवभु (नमुंआंवि)/२२.५%/११०३, दि.२५.०९.२०२५** रोजी हे शुद्धीपत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंडधारक **श्री. ओमकार तुकाराम भगत** यांनी सादर करण्यात आलेल्या **हक्कसोडपत्रा**नुसार **नोंदणी क्र. पवल-२-१३२९८-२०२५, पावती क्र. १५००२, दि.२४.०६.२०२५** रोजी अन्वये **१. श्रीमती. पार्वती लक्ष्मण भगत, २. श्रीमती. सविता तुकाराम भगत, ३. श्रीमती. अक्षता अचित म्हात्रे उर्फ अक्षता तुकाराम भगत, ४. कुमारी. स्नेहा तुकाराम भगत, ५. कुमारी. प्रतीक्षा तुकाराम भगत यांनी श्री. ओमकार तुकाराम भगत** यांना **भूखंड क्र.१२१, सेक्टर-१, क्षेत्र ५००.०० चौ.मी.** यांच्या **अविभाज्य हिस्स्यामधील ५० % क्षेत्र म्हणजेच क्षेत्र- २५०.०० चौ.मी. क्षेत्रफळ** लाभांत **हक्कसोडपत्र** तयार करण्यात आले आहे. तसेच सोबत नोंद करण्यात आलेल्या हक्कसोड दस्तऐवजमध्ये **श्रीमती. अक्षता अचित म्हात्रे उर्फ अक्षता तुकाराम भगत** ऐवजी **श्रीमती. अक्षता अचित म्हात्रे उर्फ अक्षता तुकाराम म्हात्रे** असे नमुद करण्यात आले आहे. सदर दस्तऐवजची **"चुक दुरुस्ती पत्र" नोंदणी क्र.पवल-२-१३३५३-२०२५, पावती क्र.१५०७१, दि.२४.०६.२०२५** रोजी करण्यात आली आहे.

वाटपपत्रात करण्यात नमुद करण्यात आलेल्या भूखंडधारकांपैकी **कै. तुकाराम लक्ष्मण भगत** यांचे दि. २५.११.२०२३ रोजी निधन झाले असल्याने पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर यांचेकडील दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८२५/२०२४ यांनी कै. तुकाराम लक्ष्मण भगत यांचे वारस म्हणून **१. श्रीमती. पार्वती लक्ष्मण भगत, २. श्रीमती. सविता तुकाराम भगत, ३. श्री. ओमकार तुकाराम भगत, ४. श्रीमती. अक्षता अचित म्हात्रे उर्फ अक्षता तुकाराम भगत, ५. कुमारी. स्नेहा तुकाराम भगत, ६. कुमारी. प्रतीक्षा तुकाराम भगत** यांना वारस म्हणून घोषित करण्यात आले आहे. या अनुषंगाने या विभागातून **क्र. सिडको/अमुभुवभु (नमुंआंवि)/२२.५%/११०२, दि.२५.०९.२०२५** रोजी हे शुद्धीपत्र देण्यात आले आहे.

उक्त दुय्यम निबंधक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमुद केल्यानुसार सदर भूखंडाचे हक्क खातेदारांच्या लाभात सोडले आहेत, ते खातेदार पुढील प्रमाणे :

| हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|
| १. श्रीमती. पार्वती लक्ष्मण भगत,<br>२. श्रीमती. सविता तुकाराम भगत,<br>३. श्रीमती. अक्षता अचित म्हात्रे उर्फ अक्षता तुकाराम भगत,<br>४. कुमारी. स्नेहा तुकाराम भगत,<br>५. कुमारी. प्रतीक्षा तुकाराम भगत | श्री. ओमकार तुकाराम भगत |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तींची नावे सदरील भूखंडाचे भूखंडधारक म्हणुन नोंद घेण्यात येत आहेत. व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपीत भूखंडातील भुखंड करारामधील आपले हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत, अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात आल्यानंतर भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी **अति. मुख्य भुमी व भुमापन अधिकारी (नमुंआंवि), तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)(प्र.)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
**सिडको/जनसंपर्क/३९४/२०२५-२६**

### पनवेल महानगरपालिकेतर्फे जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

# दिव्यांग बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी महापालिका नेहमीच सकारात्मक : उपायुक्त रविकिरण घोडके



**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल महानगरपालिका दिव्यांग कल्याण विभागातर्फे जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून दिनांक आज ३ डिसेंबर, बुधवार २०२५ रोजी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून कळंबोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

महापालिकेच्या वतीने मनपा क्षेत्रातील दिव्यांग नागरिकांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जात आहे. अशा पध्दतीने सर्वेक्षण करणारी पनवेल महापालिका ही महाराष्ट्रातील एकमेव महापालिका आहे. या सर्वेक्षणांतर्गत सुमारे साडेतीन हजार दिव्यांग बांधवांची नोंद पालिकेकडे झाली आहे. अजूनही ज्या दिव्यांग बांधवाची नोंद पालिकेडे झाली नाही त्यांनी पालिकेकडे अधिकृत नोंदणी करावी. दिव्यांग धोरणांची अमंलबजावणी करताना याची मदत होणार असून दिव्यांग बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी महापालिका नेहमीच सकारात्मक असल्याचे प्रतिपादन उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले.

वैद्यकिय आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी यावेळी दिव्यांग बांधवांसाठीच्या महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामध्ये दिव्यांग बांधवांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्त तपासण्या, कान नाक घसा तपासणी, आयुष्यमान कार्ड वाटप करण्यात आले होते. किशोर गोखील यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाबरोबरच ' मेरी आवाज ही मेरी पेहचान है' हा खास अंध बांधवांच्या गाण्याच्या कार्यक्रम यावेळी सादर करण्यात आला. या कार्यक्रमास दिव्यांग बांधवांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला. याचबरोबर मनोरंजनात्मक सहभागात्मक खेळांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित दिव्यांग संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध स्पर्धांमध्ये सुमारे १७ सुवर्ण पदक जिंकलेले कळंबोली मधील दिव्यांग वेट लिफ्टींग व गोळाफेक चॅम्पियन विनोद देवकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी घेण्यात आलेल्या विविध मनोरंजन खेळांमधील विजेत्यांना देखील सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, कळंबोली पोलिस स्थानकाचे सहाय्यक पोलिस अधिक्षक दत्तात्रय डफळ, दिव्यांग विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, वैद्यकिय अधिकारी डॉ. भक्तराज भोईट, डॉ. पंडित, दिव्यांग क्रांती संघटनेचे अध्यक्ष बी.जी पाटील, राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष दिपक घाग, समाजसेवक प्रज्योत सिंग धार्मा,प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे अध्यक्ष सुरेश मोकल, तसेच मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

दैनिक रायगड नगरी गुरुवार, दि.४ डिसेंबर २०२५

# अनोळखी तरुणांनी एका अल्पवयीन मुलीची सोनसाखळी लुटली

**दै.रायगड नगरी | पनवेल**

तीन अनोळखी तरुणांनी एका अल्पवयीन मुलीची सोनसाखळी लुटल्याची घटना कामोठे वसाहत परिसरात घडली आहे .

कामोठेत सकाळी फेरफटका मारणाऱ्या अल्पवयीन मुलीची स्कूटीवरून आलेल्या तीन अनोळखी तरुणांनी सोनसाखळी लुटल्याची घटना घडली असून . कामोठे उपनगरातील सेक्टर २५ येथील जेएनपीटी ते कळंबोली सर्कलला जोडणाऱ्या सेवा रस्त्यावर हा प्रकार घडला. तीन युवकांनी स्कूटीवरून पहाटेच्या वेळी घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला थांबवले. मुलीला जबरदस्तीने अडवून तिच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावून नेली. या वेळी मुलीच्या मानेला जबर जखम झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that I MS. SHARDA SHIVAPPA HULLUR residing at B-102, Phoenix Residency, Plot No. 64, Sector-20, Kharghar, Navi Mumbai, Pin-410210, do hereby solemnly affirm and declare as under :-

• That in my 10th marksheet, my date of birth was recorded incorrectly as 25/04/2000.

• I say and declare that as per my birth certificate, my correct date of birth is 24/04/2000.

Place: Kharghar, Panvel, Raigad.
Date: 03/12/2025

SD/-
**MS. SHARDA SHIVAPPA HULLUR**
**B-102, Phoenix Residency, Plot No. 64, Sector-20, Kharghar, Navi Mumbai, Pin-410210**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद केलेली मिळकत ही श्री. हनुमान सदाशिव पाटील वगैरे इतर यांचे सामाईक नांवे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वलप, ता. पनवेल, जि. रायगड.**

| मालक/ कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.हनुमान सदाशिव पाटील वगैरे इतर | ४६/६ | एकूण क्षेत्र ०-९१-०० हे.आर. यापैकी हनुमान सदाशिव पाटील यांचे सामाईक क्षेत्र ०-२८-३० हे. आर यापैकी अर्जदार यांचे हिश्याचे विक्री क्षेत्र ०-०५-०० | ४.२७ |

मौजे वलप, ता. पनवेल, जि. रायगड येथील वर नमुद मिळकत जमीन मालक श्री. हनुमान सदाशिव पाटील यांचे हिश्याचे एकूण ५ गुंठे क्षेत्र आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमुद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०३/१२/२०२५

सही/-
**मयुरेश प्र. हनुमंते**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**शॉप नं.१०१, बी विंग, योगेश्वर कृपा बिल्डींग, प्लॉट नं.५६, ठाणा नाका रोड, प्रांत ऑफिस जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८२८६१२१३३३**

ॲड. विजयेंद्र नारायण मुंढे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१४४२/२०२५
नि.नं.७/ड
ने. ता. २३/१२/२०२५

१. श्री. शेवन परशुराम पाटील
वयः ६० वर्षे, धंदा-शेती,
रा. मु. वळवली, पो. नावडे, तळोजे मजकूर,
ता. पनवेल, जि. रायगड
२. सौ. इंदिरा आनाजी कडू
वयः ४७ वर्षे, धंदा गृहीणी,
राहणार चिंध्रण, देवीचापाडा, ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदारांची आई कै. हिराबाई परशुराम पाटील ह्या दिनांक ०१/०१/२०२२ रोजी मु वळवली, पो. कळंबोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथे मयत झालेल्या आहेत. तसेच कै. हिराबाई परशुराम पाटील यांचे पती कै. परशुराम नारायण पाटील हे दिनांक १३/०४/२०१९ रोजी मौजे एम. जी. एम. हॉस्पीटल, कामोठे, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथे मयत झालेले आहेत.

कै.हिराबाई परशुराम पाटील यांचे मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहीवाटीची खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मालमत्ता क्र. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ चौ.फुट/चौ.मी. |
|---|---|---|---|
| वळवली, ता.पनवेल, जि.रायगड | १०४ | भिंतीचे कौलारु | १६×१५ / २४० |

वर नमूद मिळकतीत कै. हिराबाई परशुराम पाटील यांचे वारसदार वा नात्याने अर्जदार क्र. १ व २ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत कै. हिराबाई परशुराम पाटील यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज पनवेल येथील मे. सह दिवाणी न्या. कनिष्ठ, स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमुद केलेल्या मिळकतीस कै. हिराबाई परशुराम पाटील यांचे अर्जदार नं १ व २ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख १८/११/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

मिळकत क्र. द्वारका बंगलो, फेज २, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८ सर्व्हे नं. ११७/१, ११७/२, प्लॉट नं. ०७, क्षेत्रफळ १७४ चौ. मिटर मिळकत ही सोहेल इत्तेखाब आलम हवालदार यांच्या मालकीची असुन त्यांनी सदर मिळकत ही दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी विकत घेतली आहे.

तसेच सदर मिळकती संदर्भात डेबटस रिकव्हरी ट्रिब्युनल (DRT) नं. २ कुलाबा, मुंबई कोर्ट येथे केस चालु आहे. रिकव्हरी प्रोसेडिंग नं. टिआरपी. ११२/२०२३ असा आहे.

तसेच सदर मिळकत विकत घेतल्या संदर्भात माझ्याकडे सर्व कागदपत्र आहेत. जसे सेल डिड, सातबारा, फेरफार, प्रॉपर्टी टॅक्स इ.

तरी सदर मिळकत संदर्भात कुणाला काही आक्षेप अथवा माहिती हवी असल्यास त्यांनी सोहेल इत्तेखाब आलम हवालदार यांच्याशी संपर्क साधावा.

पनवेल
दि.०३/१२/२०२५

सही/-
**सुहेल आलम हवलदार**
**मोबाईल नं.७७१५९२४२६०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत नंदा रुपचंद पाटील व इतर यांचे (अविभाज्य हिस्साचे संपूर्ण क्षेत्र) मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा -रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे विंधणे येथील मिळकत भूमापन नं. २७१/४ यांसी (अविभाज्य हिस्साचे संपूर्ण क्षेत्र) एकूण क्षेत्र ०.१४.०० हे. आर. प्र. व पोटखराबा ०.०१.८० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये १.३७ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : ४ डिसेंबर २०२५

सही/-
**श्री.विनायक र. ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३,**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

Borade-Kapoor Court
Adv.Nitin S. Khopade

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE (S. D)
PANVEL, AT PANVEL

Civil M.A. No.1417/2025
Exh No.6/D
N.D. 14/01/2026

1. Smt. Hirabai Hanumant Jadhav
2. Shri. Kiran Hanumant Jadhav
3. Mrs. Varsha Vijay Babar — Applicants

V/s.

Nil — Respondents

Whereas, the all Applicants herein have filed a Miscellaneous Application No. 1417 of 2025 (hereinafter referred to as the said M.A), for grant of Heirship Certificate under BOMBAY REGULATION VIII OF 1987 before the Court of the Civil Judge S. D. Panvel Umt. Barade), in order to be declared as the legal heirs of deceased Late. Hanumant Yashwant Jadhav with respect to immovable properties more particularly mentioned in schedule of property herein below and having full right and authority to inherit moveable and/or immovable assets, if any, of the said deceased Late. Hanumant Yashwant Jadhav.

Whereas last abode of deceased Late. Hanumant Yashwant Jadhav at Kamothe, Panvel, Raigad and he died on 27/12/2021 and therefore it has become necessary for all the Applicants obtain Heirship Certificate as stated above.

You the member of the public are hereby given notice to appear in the Court of the Civil Judge (S.D.) Panvel, in person or by pleader duly instructed and file your say/objections if any within 30 (thirty) days from the date of publication, failing which said M.A will be finally decided and adjudicated with the presumption that there is no objection from anybody.

**SCHEDULE OF PROPERTY**

B-305, Maruti Sadan, Plot No.43, Sector-10, New Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad, Maharashtra, area 565 sq.ft.

Given under my hand and seal on this 2 day of Dec. 2025.

Sd/- Jr.Clerk Court SD Panvel — Court Seal — Sd/- Asst.Supted. Court SD Panvel

# रायगड जिल्ह्यात दहा महिन्यात महिला अत्याचाराचे ८९ अर्ज

**दै.रायगड नगरी | उरण**

गेल्या दहा महिन्यात महिला अत्याचार विरोधात रायगड जिल्ह्यात तब्बल ८९ अर्जाची नोंद झाली आहे. घरगुती हिंसाचार, मानसिक छळ, आर्थिक शोषण तसेच कौटुंबिक वाद यासारख्या विविध कारणामुळे महिलांनी तक्रारी नोंदवल्या या प्रकरणावर भरोसा सेलने कारवाई केली असून अनेक प्रकरणात सकारात्मक समझोता करून कुटुंब एकत्र आले आहेत.

भरोसा सेलमध्ये नोंदवलेल्या अर्जापैकी ७० महिलांचे समुपदेशन करण्यात आले. पती-पत्नी मधील संवाद भाव, कौटुंबिक तणाव, व्यसनाधीनता,आर्थिक दडपण अशा कारणामुळे निर्माण झालेल्या समस्यावर समुपदेशकांनी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून समेटाचे प्रयत्न केले. यातील अनेक कुटुंबामध्ये ताणतणाव कमी करण्यात यश मिळाले असून काही प्रकरणात भविष्यातील समस्या टाळण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान समुपदेशनानंतरही समाधान न झालेल्या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात आठ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शारीरिक अत्याचार, सातत्याने होत असलेल्या छळाच्या घटनांमध्ये पोलिसांनी कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणावर पुढील तपास सुरू आहे.

सकारात्मक बाब म्हणजे समुपदेशन व चर्चेच्या माध्यमातून २२ जोडप्यांनी समझोता करून पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र अनेकदा मोबाईलचा वापरही जोडप्यांमध्ये वादास कारणीभूत ठरत आहे. अतिरेक वापरासह सोशल मीडियावरील अनैतिक गोष्टींचाही त्यात भर पडत आहे एकूण नोंदवलेल्या अर्जापैकी ६५ अर्जांची निर्मिती करण्यात आली असून चौकशी सोबतच समुपदेशन पूर्ण करून फाईल बंद करण्यात आली.असे सेलच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, मे सत्यम डेव्हलपर्स तर्फे पो पा १. श्री करण राजेश गुलाटी राहणारः ऑफीस नं. १२०४/०५/०६, मैथिल सिग्रेट, प्लॉट नं. ३९/४, सेक्टर ३० ए. वाशी, नवी मुंबई, यांना सिडको लि, कडून मौजे नोड खारघर येथील फाईल नं ८७ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेल्या शेतक-यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा होऊन हस्तातरंण झालेले आहे. त्याप्रमाणे माझे अशिल मे श्री कृपा बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर १) श्री. बाबुराव कृष्णा भोईर राहणार शॉप नं. १, बोंन्जर कार्निवल, प्लॉट नं. ८, सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई ,४१०२१०, यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल नं.८७ खारघर**

| नोड | सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | १० | ७ ए | २६६.९२ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.३/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, माझे अशील अ. कै. भुरी बामा उघडा (मयत) यांचे वारस १) श्री. रामा बामा उघडे आ. के. शांती गोमा ढुमणा (मयत) यांचे वारस १. श्री. मंगा गोमा ढुमणा (मुलगा) २. श्री. पदया गोमा ढुमणा (मुलगा) ३. सौ. चंद्री महादू वारगडा (मुलगी) ४. श्री. धाया गोमा ढुमणे (मुलगा) ५. श्री. रमेश गोमा ढुमणा (मुलगा) ६. श्री. रामदास आलो झुगरे ७. श्री. भरत आलो झुगरे ८. श्री. बळीराम आलो झुगरे इ. कै. ताई चाहू वारगडा (मयत) वारस नाही (मृत्यू दाखला आहे) १. सौ. राघी किसन घुटे ई. कै. बुध्या रामा झुगरे (मयत) यांचे वारस १. सौ. विठाबाई बुधाजी झुगरे (पत्नी) उ. कै. पदमा रमेश ढुमणा (मयत- मुलगी) यांचे वारस १. सौ. वर्षा गुरुनाथ गावंडी (नात) उर्फ सौ. वर्षा रमेश ढुमणे २. कु. हरेश रमेश ढुमणे (नातू) ३. सी. बेबी गणपत भगत (मुलगी) ४. सौ. पुष्पा नामदेव सफरा (मुलगी) ऊ. कै. सोमा रामा झुगरे (मयत) यांचे वारस १. सी. मधी सोमा झुगरे (पत्नी) ऊ. कै. सोमा रामा झुगरे (मयत) यांचे वारस १. सौ. मधी सोमा झुगरे (पत्नी) २. श्री. राजेंद्र सोमा झुगरे (मुलगा) ३. सौ. अनिता पशुराम दरवडा (मुलगी) ४. श्री. गजानन सोमा झुगरे (मुलगा) ५. श्री. शंकर रामा झुगरे. ६. श्री. रामदास आलो झुगरे हे शेतकरी असून यांनी खालील वर्णनाची (शेतजमीन) मालमत्ता/ शेतजमीन कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे.

वरीलप्रमाणे परिशिष्ट क. १
सदरहु शेतजमीन

येणेप्रमाणे वर्ग वन वहीवाटीची, गांव: गाढे तालुकाः पनवेल जिल्हा : रायगड, या वर्णनाची जमीन की जिचे ७/१२ दप्तरीनुसार वर्णन खालीलप्रमाणे आहे:- ज्यामध्ये झाडे झुडपे पाला पाचोळा व इतर सामुग्री सोबत की जिचे ७/१२ दप्तरीनुसार वर्णन खालीलप्रमाणे आहेः-

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| गाढे | ८ | १/अ | २.७६.७० |
| | ८ | १/ब | ३.२०.०० |
| | ८ | १/क | ३.२०.०० |
| | ८ | १/ड | ३.२०.०० |
| | ८ | १/ई | २.७१.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखात इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासाहित लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल, मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासाहित हरकत नोंदवली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.३/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविणेत येत की, खाली वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिल श्री. शेखर श्यामशेठ शेट्टे, सौ सायली शेखर शेट्टे, दोघे रा. चौंढी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची व त्यांच्या नावे सिटी सर्व्हे खात्याकडे नोंदविलेली खालील वर्णनाची मिळकत ही श्रीमती ज्योती अजित शहा, श्री. विनोद लिलाधर शहा, रा. रत्नेश को-ऑप ही सोसायटी, फ्लॅट नं. ए-१७, लाईन आळी, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड खरेदी करण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पनवेल महानगरपालिका, ता. पनवेल, जि. रायगड हद्दीतील व दुय्यम निबंधक पनवेल यांचे कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत**

| मौजे | अंतिम भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| पनवेल | १२५२+१२५४/बी | ८०.३ |

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीत कोणाही इसमाचे वारसाईने, इजमेंटरी हक्काने , पोटगीने, विक्री कराराने, लिएन, गहाण, वदलावदली अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क-हितसंबंध वरील मिळकतीत निगडीत असल्यास त्यावद्दलची हरकत संबंधी इसमाने कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आमचे पत्त्यावर सादर करावी याप्रमाणेचे कोणतीही नोटीस विहित मुदतीत आम्हांस प्राप्त न झाल्यास सदर नोटीसींतील मिळकत ही पूर्णपणे निर्वेद व वोजारहीत असून हस्तांतरणास पात्र आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील विहित मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

हे सर्व जनतेस कळावे.

पनवेल
दि.०३/१२/२०२५

सही/-
**ॲड.प्रताप शिवराम जाधव**
**रा. हरिग्राम, पो. मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.नं. ९१६७११८४७३**

अर्जदार यांचे वकील
ॲड.प्रदीप तु. मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथिल मा. दि. न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१५१७/२०२५
नि.नं.८
ने. ता. ०७/०१/२०२६

१) श्री.चंद्रशेखर एकनाथ पाटील
उ.व. ४९, धंदा : ॲटो रिक्षा
२) श्री.किशोर एकनाथ पाटील
उ.व. ४५, धंदा : व्यवसाय
दोघेही रा.अ.क्रं.१, फ्लॅट नं.४०१
अ.क्रं.२, फ्लॅट नं.२०१,
मातोश्री निवास, पुष्पक नोड वडघर,
चिंचपाडा, प्लॉट नं.१५३, सेक्टर क्रं.आर-१,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ. नलिनी संतोष चिमणे
उ.व. ४८, धंदा : घरकाम,
रा. जुई. कराडी समाज मंदीर जवळ,
(कामोठे) ता. पनवेल, जि. रायगड.
४) सौ. सुरेखा शशिकांत चिमणे
उ.व. ४५, धंदा : घरकाम,
रा. जुई, कराडी समाज मंदीर जवळ,
(कामोठे) ता. पनवेल, जि. रायगड.
५) सौ. सुशिला सुहास पाटील
उ.व. ४४, धंदा : घरकाम,
रा. वेश्वी, ता. उरण, जि. रायगड. — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै. मथुराबाई एकनाथ पाटील यांचे दिनांक ८/०९/२०२४ रोजी, रा. फ्लॅट नं. ४०१, मातोश्री निवास, पुष्पक नोड वडघर, चिंचपाडा, सेक्टर क्रं. आर १, ता. पनवेल. जि. रायगड. येथे निधन झाले आहे. मौजे वडघर, ता. पनवेल, येथिल सदर संपादीत मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे.

**कोष्टक (अ) मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु.के.नं. |
|---|---|---|---|
| वडघर | ४१/४ | ०-२८-८ | ११० |
| | ६७/२ | १-२०-५ | |
| | ४२/१ | ०-२९-६ | ११० |
| | १०१/३ | ०-२३-३ | ९९ |
| | ४१/५ | ०-०१-० | ११० |
| | १०१/७ | ०-२०-२ | |
| | १०३/३ब+७ब+८ | ०-१६-२ | |

तसेच कै. मथुराबाई एकनाथ पाटील व इतर यांची मौजे पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि.रायगड. येथिल शेतजमीन मिळकत शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीत संपादीत केलेली आहे तिचे वर्णन खालील आहे.

**कोष्टक (ब) मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु.के.नं. |
|---|---|---|---|
| पारगाव डुंगी | ३६/७ | ०-२२-९ | ४ |
| | ३९/३ | ०-२०-२ | |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता कै. मथुराबाई एकनाथ पाटील यांचे नावे असलेले घर संपादीत करण्यात आलेले असुन त्याबाबत पुनःर्वसन योजने अंतर्गत सिडको वाटपपत्र. क्रं. सिडको/ आंवित / पुनःस्थापना / तरघर / २०१५/३८४. नुसार पुष्पक नोड, सेक्टर क्रं. २५ए, भुखंड क्रं. ५१९. एकुन क्षेत्र १०० (चौं.मी.) हा भुखंड मंजूर करण्यात आलेला आहे.

कै. मथुराबाई एकनाथ पाटील यांचे पश्चात संपादीत मिळकती बाबत सिडको कडुन मिळणा-या अविभक्त भुखंडा बाबत अर्जदार क्रं. १ ते ५ यांनी वारस दाखला मिळणेकरीता या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै. मथुराबाई एकनाथ पाटील, यांना अर्जदार क्रं. १ ते ५ हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरीतीने हरकती न घेतल्यास हे मा. न्यायालय अर्जदार १) श्री. चंद्रशेखर एकनाथ पाटील, २) श्री. किशोर एकनाथ पाटील, ३) सौं. नलिनी संतोष चिमणे ४) सौ. सुरेखा शशिकांत चिमणे ५) सौ. सुशिला सुहास पाटील हे मयत मथुराबाई एकनाथ पाटील, यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. ०१/१२/२५ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# निकाल लांबणीवर पडल्याने उमेदवारांमध्ये नाराजी

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** रायगड जिल्ह्यातील दहा नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी २डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. परंतु ३डिसेंबर रोजी होणारी मतमोजणी पुढे ढकलल्याने उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची धाकधूक वाढली आहे. सर्व नगरपालिकांची मतमोजणी आता २१ डिसेंबर रोजी होणार असल्याने निकालासाठी तब्बल १९ दिवस वाट पहावी लागणार आहे. या निर्णयाबाबत उमेदवारांमध्ये नाराजीचा सुरू आहे.

नगरपालिका निवडणूकीसाठी मतदान झाल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी मतमोजणी होवून निकाल जाहीर केला जाणार होता. परंतु



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात यासंदर्भात दाखल याचिकेवर सुनावणी दरम्यान आज मतदान झालेल्या आणि २० नोव्हेंबर रोजी होणारया मतदानाची मतमोजणी एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर रोजी घ्यावी असे निर्देश न्यायालयाने दिल्याने उमेदवार आणि कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला आहे.

अनेक उमेदवारांनी आणि त्यांच्या समर्थकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली. ज्या उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांना विजयाची खात्री आहे त्यांनी विजयी जल्लोषाची तयारी केली होती. याचे नियोजन बरेच दिव आधीपासूनच सुरू होते. गुलाल, वाद्यपथक यांची अगोदरच ऑर्डर दिली होती. त्यासाठी आज सकाळपासूनच उमेदवारांचे कार्यकर्ते मतदानासाठी मतदारांना बाहेर काढत होते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते आणि अचानक न्यायालयाचा निर्णय येवून धडकला. मतमोजणी पुढे ढकलली गेल्याची चर्चा सुरू झाली. न्यायालयाच्या निर्णयाने त्यांच्या आनंद साजरा करण्याच्या कार्यकर्त्यांच्या इच्छेवर पाणी पडले.

ज्या नगरपालिकांसाठी मतदान झाले त्यांची मतमोजणी २१ नोव्हेंबर रोजी होणार आहे. म्हणजे निकालासाठी १९ दिवस वाट पहावी लागणार आहे. हा कालावधी खूप मोठा आहे. एवढे दिवस उत्सुकता ताणली जाणार आहे. राजकीय पक्षांचे नेते, उमेदवार आणि कार्यकर्ते यांच्या मनावर मतमोजणी आणि निकालाचे दडपण राहणार आहे. एकदा का मतमोजणी होवून निकाल लागून गेला असता तर आम्ही पण मोकळे झालो असतो अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. निकाल लांबणीवर पडल्याने त्यांच्यामध्ये निराशेचे वातावरण आहे.

## दत्ता म्हात्रे वसतीगृहाचे बबनदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

कमल गौरी हिरु पाटील शिक्षण संस्थेच्या दत्तात्रय वसतीगृहाचे संस्थेचे चेअरमन बबनदादा पाटील यांच्या शुभहस्ते भव्य उद्घाटन करण्यात आले. हे वसतीगृह विशेषतः ग्रामीण व दूरस्थ भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरणार आहे.

संस्थेच्या बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालय, बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, बबनदादा पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग आणि बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी या चारही महाविद्यालयांमध्ये शिकण्यासाठी कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी प्रवेश घेतात. मात्र राहण्याच्या सोयीअभावी त्यांना खाजगी खोल्या, मेस किंवा जास्त खर्चिक पीजीमध्ये राहावे लागत होते. ही अडचण ओळखून संस्थेने स्वतःच्या जागेत अत्याधुनिक सुविधा असलेले स्वतंत्र वसतीगृह उभारले आहे. या वसतीगृहामुळे आता मुला-मुलींसाठी स्वतंत्र खोल्या, २४ तास पाणी-वीज, सुरक्षित वातावरण, मेस सुविधा आणि अभ्यासासाठी शांत परिसर उपलब्ध होणार आहे.

विशेष म्हणजे हे वसतीगृह अगदी परिसरातीलच असल्याने विद्यार्थ्यांचा वेळ व पैसा दोन्ही वाचणार आहे. उद्घाटनप्रसंगी उपजिल्हा अध्यक्ष तथा संस्थेचे संचालक रामदास पाटील, गणेश पाटील, कैलास पाटील, स्मित भोईर, अनुसया बबन पाटील, विष्णू नामदेव म्हात्रे, बबन केणी, शंकरसेठ केणी, विजया केणी, बाबू पाटील, विशाल केणी, मुरलीधर म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, राजा खुटलें, बाळा म्हात्रे, अपर्णा भोईर, प्राचार्य शिनगारे सर, डॉ. कांबळे सर, महाजन सर यांच्यासह परिसरातील मान्यवर, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे चेअरमन बबनदादा पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे आणि त्यांना शहरात येऊन राहण्याची कुठलीही अडचण येऊ नये, हाच आमचा उद्देश आहे. दत्ता म्हात्रे वसतीगृह हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. या उद्घाटनाने परिसरातील शिक्षण क्षेत्रात कमल गौरी हिरु पाटील शिक्षण संस्थेची विश्वासार्हता आणखी वाढली असून, येत्या काही दिवसांतच हे वसतीगृह विद्यार्थ्यांनी गजबजून जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## दोन ठिकाणी घरफोडी : लाखो रुपयांचा ऐवज लंपास



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील मोहल्ला भागात असलेल्या दोन वेगवेगळ्या इमारती मधील बंद असलेले एकूण पाच फ्लॅट फोडून लाखो रुपयाचा ऐवज व रोख रक्कम लंपास केल्याची सोमवार दिनांक १ डिसेंबर ची घटना ताजी असतानाच मंगळवार दिनांक २ डिसेंबर रोजी रात्री नागोठण्यातील रमाई नगर येथील बंद असलेल्या दोन घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत दोन्ही घरातील मिळून सुमारे १५ ते २० लाख रुपयांचे दागिने व रोकड लंपास केले आहेत. नागोठण्यात लागोपाठ दोन दिवसात घडलेल्या या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान उभे केले आहे.

मंगळवारी घडलेल्या चोरीच्या दुसऱ्या घटनेत नागोठण्यातील रमाई नगर येथील व कौटुंबिक कारणास्तव मुंबई येथे गेलेल्या विजय शिर्के व जिंदाल कंपनीत रात्रपाळीला गेलेल्या सचिन गायकवाड यांच्या बंद असलेल्या घरांना चोरांनी लक्ष करून सोन्याच्या दागिन्यांचा लाखो रुपयांचा ऐवज व रोकड लंपास केली आहे.

या संदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार नागोठणे रमाईनगर मधील राहुवासी विजय धर्मा शिर्के हे लग्न कार्यानिमित्त मुंबई येथे सहकुटुंब गेले होते म्हणून त्यांचे घर बंद होते. त्याचाच चोरट्यांनी फायदा घेऊन कुलूप तोडून घरातील ३ सोन्याची चैन, ५ सोन्याच्या अंगठ्या, लहान मुलांचे ४ सोन्याचे लॉकेट, आर्धा किलो चांदी व १६ हजार रुपयाची रोख रक्कम तसेच रमाईनगर मधील रहिवासी सचिन नारायण गायकवाड हे रात्रपाळी असल्यामुळे ते कामाला गेले होते त्यामुळे त्यांची पत्नी आपल्या लहान बाळासह रमाईनगर मध्येच राहत असलेले त्यांचे दीर संतोष गायकवाड यांच्या घरी रात्री गेल्या होत्या. त्यामुळे सचिन गायकवाड यांचे घर बंद असल्याने चोरट्यांनी कुलूप तोडून त्यांच्या घरात असलेले साडेतीन तोळ्याची सोन्याची गंठण, १ सोन्याचा हार, २ सोन्याची चैन, गंठणचे सोन्याचे पान, सोन्याची बोरमाळा, सोन्याच्या माळ्यांची माळ, सोन्याच्या ४ अंगठ्या, सोन्याचे कानातील ४ छोटे जोड, सोन्याचे कानातील ४ मोठे जोड, सोन्याचे मोठे पान, चांदी १ किलो, ५० हजार रुपये रोख रक्कम असा लाखो रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

नागोठण्यातील चोरीच्या या दोन्ही घटनांचा तपास करण्याचे काम पोलिस यंत्रणेकडून सुरू करण्यात आले असून डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले आहे. या चोरट्यांना शोधण्याचे मोठे आव्हान पोलिस यंत्रणेसमोर उभे राहिले आहे. याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी घटनास्थळी जाऊन काही धागेदोरे लागतात का याची सखोल तपासणी केली असून याप्रकरणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ते स्वतः तपास करीत आहेत.

## कर्जत न.प निवडणूकीच्या मतदान मशीन सी.सी टिव्हीच्या देखरेखीत स्ट्राँगरूम बंदीस्त

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** राज्यातील होणाऱ्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी पार पडलेली मतदान प्रक्रिये नंतर दुसऱ्या दिवशी होणारी मत मोजणी ही राज्य निवडणूक आयोगाकडून न्यायालयाच्या निर्णयानुसार दि. २१ डिसेंबर पर्यंत पुढे ढकलली आहे.

कर्जत नगरपरिषदेची काल दि. ०२ डिसेंबर रोजी पूर्ण झालेली मतदान प्रक्रियाची मतमोजणी ही १८ दिवसांनी पुढे होणार असल्याने कर्जत नगरपरिषदेच्या कार्यालतील पहिल्या मजल्यावरील स्ट्राँग रूम मध्ये एकूण ३३ व्ही एम तथा कंट्रोल युनिट मशीन या निवडणूक निर्णय आधिकारी यांच्या स्तरावर बंदिस्त करण्यात आल्या आहेत. तर सहायक निवडणूक अधिकारी तथा कर्जत नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी चव्हाण यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या स्ट्राँग रूमच्या सुरक्षा व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पाच सी.सी टिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. तर दोन पोलीस अधिकारी तसेच पहिल्या मजल्यावरती चार हत्यारधारी पोलीस गार्ड व तळमजल्यावर चार असे एकूण आठ पोलीस गार्ड तैनात करण्यात आले आहे. तर आग प्रतिबंधक दुष्टीकोनातुन त्या स्टाँगरूम फायर इंडिकेशन यंत्र देखील बसविण्यात आले आहे. उमेदवार तसेच त्यांचे प्रतिनिधी यांना स्टाँगरूमची देखभाल व पाहणी करण्यासाठीची व्यवस्था व त्या ठिकाणी बसण्याची व्यवस्था देखील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कडून करण्यात आली आहे.



## दुबार मतदारांबाबत तपासणी करून मतदार यादी निर्दोष करणेबाबत महापालिका प्रयत्नशील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता तयार करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीतील संभाव्य दुबार नावाबाबत तपासणी करून मतदार यादी निर्दोष करण्यासाठी आज आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे व निवासी नायब तहसिलदार संभाजी शेलार यांनी सर्व ४६१ मतदान केंद्र स्तरीय अधिकारी व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण दिले आहे. यावेळी उपस्थित मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.), पर्यवेक्षक, महानगरपालिका कर्मचारी यांना मतदार यादीतील दुबार नावे बी.एल.ओ. पच्या मदतीने शोधून सदर मतदार दुबार असलेबाबत खात्री करणे विषयक सूचना देण्यात आल्या.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दुबार मतदारांबाबत करावयाच्या कार्यवाहीविषयी सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील एकूण ४६१ मतदान केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून मतदार याद्या अधिकाधिक निर्दोष करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. याच उद्देशाने महापालिकेने पुढाकार घेऊन हे प्रशिक्षण घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या होत्या.

प्रारुप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना यांची पडताळणी करून व मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन मतदार याद्या निर्दोष करण्यासाठी सर्वतोपरी कार्यवाही करणार असल्याचे निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे.

> प्रारूप मतदार यादीवरील प्राप्त हरकती व सूचना तसेच दुबार मतदारांबाबत तपासणी करून मतदार याद्या अधिक निर्दोष होतील यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे.
>
> **मंगेश चितळे, आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका**

## दिव्यांगांना सहकार्याबाबत माझे झुकते माप : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उलवे**

दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. मी दिव्यांगांबाबत नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे. गव्हाण पंचक्रोशीतील अनेक दिव्यांगांना मी मदतीचा हात दिला आहे. ज्या दिव्यांग पालकांची मुले आमच्या 'यमुना सामाजिक संस्थे'च्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेत आहेत त्यांना फीमध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल. दिव्यांगांचे प्रश्न वेगळे आहेत; परंतु अडीअडचणीला 'सुखकर्ता'चा दरवाजा त्यांच्यासाठी खुला आहे. कारण दिव्यांगांना मदत करताना मी झुकते माप देतो, असे मत आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी गव्हाण येथे जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.



गव्हाण येथील शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेतर्फे बुधवारी जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महेंद्रशेठ घरत, माजी उपसरपंच सचिन घरत, ग्रामसेवक विजयकुमार राठोड, ॲड. रेखा चिरनेरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दिव्यांगांना दारिद्र्यरेषेखालील रेशन कार्ड आणि उत्पन्नाचे दाखले महेंद्रशेठ घरत आणि मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी रेखा चिरनेरकर म्हणाल्या, शहरातील दिव्यांगांपेक्षा ग्रामीण भागातील दिव्यांगांची धडपड वाखाणण्याजोगी आहे. येत्या काळात दिव्यांगांसाठी विशेष शाळा सुरू करण्याचे प्रयोजन आहे. दिव्यांगांना जास्तीत जास्त सक्षम करण्यासाठी हातात हात घालून काम करण्याची गरज आहे.

यावेळी शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष अशोक कोळी, उपाध्यक्ष सचिन कोळी, खजिनदार जनार्दन कोळी, सचिव कांचन कोळी आणि सभासद उपस्थित होते. अशोक कोळी यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले.

## जागतिक दिव्यांग (अपंग)दिन मेळावा मोठ्या उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । गौतम जाधव**

**वावेदिवाळी इंदापूर ।** प्रहार दिव्यांग (अपंग)क्रांती संघटना माणगांव तालुका यांच्या तर्फे बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. माणगांव कुणबी भवन मंगल कार्यालय येथे मोठ्या आनंदाने व उत्साहाने दिव्यांग दिन हा कार्यक्रम मोठ्या आनंदाने व उत्साहाने करण्यात आला

यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे प्रमुख मान्यवर सुरेशजी मोकल कोकण विभाग अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सचिव,सुनिल घडमोडे रायगड जिल्हा अध्यक्ष,पांडूरंग डांगरेकर रायगड जिल्हा उपाध्यक्ष,रमाताई चोगले रायगड जिल्हा महिला अध्याक्षा,अशोक देवराव मारकड विस्तार अधिकारी कृषी,महादेव बक्कम माणगांव ता.कु.स.वि मंडळ अध्यक्ष,हे उपस्थित होते

तसेच यावेळी माणगांव तालुका दिव्यांग प्रहार क्रांती संघटनेचे अध्यक्ष नरेश साळवी,रेषमा के.मोरे महिला अध्यक्षा,गजानन कृ मोंडे,मगेश म.वाढवळ,सिताराम न.शेलारा,श्रीपत भा.वाढवळ,रामचंद्र मोरे,विजय गायकवाड,बाळू जाधव,नितीन जंगम,राजा काळोखे,रमेश सुतार,रमेश सकपाळ,नरेश गोठले,दिलीप महाडिक ,जयशे फराडे,जनार्दन ढमाल,तसेच बहुसंख्य दिव्यांग बाधव यावेळी मोठ्या संखेने उपस्थित होते.तसेच उपस्थित प्रमुख मान्यवरानी मार्गदर्शन करून दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.